महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : ४ मे, २०२२.

क्रमांक:९२८८/क-१ या सचिवालयातील प्रतिनियुक्तीमुळे रिक्त झालेल्या एस-१७-४७६००-१५११०० या वेतनस्तरातील **"कक्ष अधिकारी"** या पदावर लेखापाल संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे.

| अ.क्र | कर्मचाऱ्यांची नावे |
|---|---|
| १ | श्रीमती अ.अ.साने, लेखापाल |
| २. | श्रीमती लि. सं. मयेकर, लेखापाल |

२. संबंधित कर्मचाऱ्यांना कक्ष अधिकारी पदावर तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

(अ) कक्ष अधिकारी संवर्गातील पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात येत आहे.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ कक्ष अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यानंतर त्यांच्यासाठी कक्ष अधिकारी संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास, या आदेशातील कनिष्ठतम कर्मचाऱ्याला पदावनत करण्याच्या अधिन राहून सदर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

(ड) कक्ष अधिकारी या पदावर सरळसेवेद्वारे उमेदवारांची नियुक्ती झाल्यानंतर कक्ष अधिकारी संवर्गात सरळसेवेने रिक्त पद उपलब्ध नसल्यास, सरळसेवेच्या जागेवर कार्यरत असणाऱ्या कनिष्ठम कर्मचाऱ्याला पदावनत करण्याच्या अधिन राहून सदर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुभाष नलावडे)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

..२/-

\\mls-dataserver\C Branch\1401\C-101\Local Disk (d)\E Drive\2022\promotion\Class 1\Section Officer\order.doc

प्रति,

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई-४००००४ यांना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या पुढील प्रकाशनात भाग-१, अधिसूचना, याखाली प्रकाशित करण्यासाठी अग्रेषित. प्रकाशित अधिसूचनेच्या २० प्रती सचिवालयाकडे कृपया पाठविण्यात याव्यात, ही विनंती.

प्रतिलिपी :-

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.

२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

३) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

४) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

६) सर्व संबंधित लेखापाल.

७) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

८) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१०) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

११) वैयक्तिक नस्ती.

१२) निवडनस्ती.

\\mls-dataserver\C Branch\1401\C-101\Local Disk (d)\E Drive\2022\promotion\Class 1\Section Officer\order.doc